# महाराष्ट्र विधानपरिषद

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## शुक्रवार, दिनांक ११ जुलै, २०२५

## (सकाळी १०.०० ते ११.४५ वाजता)

अग्रिम प्रत

(क) : **म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा —**

**(गुरुवार, दिनांक १० जुलै, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा) —**

(१) **सर्वश्री अमित गोरखे,** सदाशिव खोत, श्रीमती चित्रा वाघ, **वि.प.स.** यांची **म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा —**

"राज्यासह पुणे जिल्ह्यातील पुणे व पिंपरी-चिंचवड शहरात भटक्या कुत्र्यांचा वावर मोठ्या प्रमाणात वाढला असून गेल्या काही दिवसांत भटक्या श्वानांनी रस्त्यावर चालणाऱ्या नागरिकांचा चावा घेतल्याच्या अनेक प्रकार निदर्शनास येणे, भटक्या श्वानांच्या वाढत्या संख्येवर नियंत्रण आणण्यासाठी महापालिकांकडून प्रयत्न करणे, परंतु केंद्रातून हस्तक्षेपामुळे श्वानांचे निर्बिजीकरण आणि लसीकरणात अडथळे निर्माण होणे, पुणे, पिंपरी-चिंचवड महापालिकेतर्फे निर्बिजीकरण आणि रेबीजरोधक लसीकरण करण्यासाठी निविदा काढल्या जाणे, परंतु या निविदा ठरावीक संस्थांनाच मिळाव्या यासाठी आयुक्त व संबंधित अधिकाऱ्यांवर दबाव आणला जाणे, यासंपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची नितांत आवश्यकता असणे, भटक्या श्वानांचे वाढलेले प्रमाण नियंत्रणात आणण्याकरीता शासनाने याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(२) **सर्वश्री अंबादास दानवे,** राजेश राठोड, सचिन अहिर, सुनिल शिंदे, डॉ. प्रज्ञा सातव, **वि.प.स.** यांची **म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा —**

"मराठवाड्याच्या विकासासाठी प्रकल्पांची घोषणा करुन शासनाकडून निधी उपलब्ध करुन देण्यात येत नसणे, दिनांक १६ सप्टेंबर, २०२३ रोजी छत्रपती संभाजीनगर येथे झालेल्या मंत्रीमंडळाच्या बैठकीमध्ये रुपये ४६००० कोटीच्या निधींच्या कामांची घोषणा होणे, बैठकीमध्ये मराठवाड्यातील विकास कामांसाठी जाहिर करण्यात आलेला निधी शासनाकडे मागणी करुनही उपलब्ध होत नसल्याने मराठवाड्यातील अनेक विकासकामे व प्रकल्प निधीअभावी अपुर्ण अवस्थेत असणे, जलसंपदा विभागास २१ हजार कोटींच्या निधीची घोषणा होऊनही निधी न दिल्याने मराठवाड्यातील प्रकल्प अपुर्ण अवस्थेत असल्यामुळे १ हेक्टर सुध्दा सिंचनामध्ये वाढ न होणे, मराठवाडा वॉटर ग्रीड योजनेसाठी प्रत्यक्षात सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पात निधीची तरतूदच नसणे, मराठवाडा वॉटर ग्रीड योजनेमध्ये असलेल्या प्रकल्पांचे काम अपुर्ण असल्याने मराठवाडा जिल्ह्यातील शेतीवर व नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण होऊन

मराठवाडयाच्या विकासावर त्याचा परिणाम होणे, छत्रपती संभाजीनगर येथे झालेल्या मंत्रीमंडळाच्या बैठकीमध्ये मराठवाड्यासाठी महत्वाचे असलेला क्रीडा विद्यापीठ ४६.६० हेक्टरवर उभारण्यास मंजुरी देण्यात येणे, परंतु निधी उपलब्ध करुन न दिल्याने अपूर्ण अवस्थेत असणे, मराठवाड्याच्या विकासामध्ये शेतीचे महत्वाचे योगदान असून हळद पिकासाठी पोषक वातावारण मराठवाड्यात असल्याने मा.बाळासाहेब ठाकरे हरिद्रा (हळद) संशोधन व प्रशिक्षण केंद्राला मंजूरी देण्यात येणे, परंतु सदर प्रकल्प निधीअभावी पूर्ण मराठवाड्यात राबविण्यात आलेला नसणे, मराठवाड्यातील मंजुर करण्यात आलेली विकास कामे व प्रकल्पांना वेळेवर निधी उपलब्ध करुन न दिल्याने प्रकल्पांच्या किंमतीमध्ये सुध्दा वाढ होत असणे, परिणामी शासनाच्या महसूलाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असणे, मंजूर विकास कामांना व प्रकल्पांची अंमलबजावणी घेण्यात येणाऱ्या निर्णयानुसार करण्यात येत नसल्याने मराठवाड्याच्या विकासावर व पायाभूत सुविधांवर त्याचा गंभीर परिणाम होणे, त्यामुळे मराठवाड्यात बेरोजगारीच्या प्रमाणात वाढ होत असून जनतेमध्ये शासनाप्रती असंतोषाची भावना निर्माण होणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(ख) : म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव -**

(१) **(मंगळवार, दिनांक ८ जुलै, २०२५, बुधवार, दिनांक ९ जुलै, २०२५ व गुरुवार, दिनांक १० जुलै, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव)** —

**सर्वश्री सदाशिव खोत,** हेमंत पाटील, विक्रम काळे, प्रविण दरेकर, डॉ. मनिषा कायंदे, सर्वश्री अमोल मिटकरी, प्रसाद लाड, श्रीमती भावना गवळी, श्री संजय खोडके, ॲड. निरंजन डावखरे, सर्वश्री कृपाल तुमाने, इद्रिस नायकवडी, श्रीकांत भारतीय, किशोर दराडे, पंकज भुजबळ, श्रीमती चित्रा किशोर वाघ, सर्वश्री चंद्रकांत रघुवंशी, किरण सरनाईक, डॉ. परिणय फुके, सर्वश्री संदीप जोशी, दादाराव केचे, संजय केणेकर, योगेश टिळेकर, श्रीमती उमा खापरे, सर्वश्री विक्रांत पाटील, अमित गोरखे, वसंत खंडेलवाल, ज्ञानेश्वर म्हात्रे, रणजितसिंह मोहिते-पाटील, धर्मगुरू राठोड, राजहंस सिंह, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव - (चर्चा पुढे सुरु )**

"राज्याच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेत कृषी क्षेत्र केंद्रस्थानी ठेऊन सिंचन क्षेत्राकडे विशेष लक्ष देण्याचा शासनाचा प्रयत्न असणे, कृषी क्षेत्रात कृत्रिम बुध्दिमता (ए-आय) तंत्रज्ञानाचा वापर करण्याचे धोरण अंमलात आले असणे, जलयुक्त शिवार योजना, नदीजोड प्रकल्प आणि रखडलेल्या सिंचन योजनांच्या माध्यमातून कृषी सिंचन वाढविण्यावर भर देण्यात आला असणे, विदर्भातील वैनगंगा-पैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्प पूर्ण झाल्यास १० लाख एकर जमिन

अप्रकाशित प्रत

ओलिताखाली येण्याची शक्यता असणे, नार-पार-गिरणा नदीजोड प्रकल्पामुळे नाशिक व जळगाव जिल्हयातील ४९,५१६ हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा लाभ होणार असणे, दमणगंगा-एकदरे-गोदावरी या २३०० कोटी रुपये किंमतीच्या नदीजोड प्रकल्पामुळे ३.५५ टीएमसी पाणी उपलब्ध होणार असणे, तापी महापुनर्भरण या १९,३०० कोटी रुपये किंमतीच्या सिंचन प्रकल्पामुळे उत्तर महाराष्ट्र आणि पश्चिम विदर्भातील खारपाण पट्ट्यातील शेतकऱ्यांना लाभ होणार असणे, महाकृषी विकास अभियान अंतर्गत केवळ १ रुपयात राबविण्यात येणाऱ्या पिक विमा योजनेत नियमितता ठेवण्याच्या दृष्टीने कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी अधिक सतर्क होण्याची आवश्यकता, अटल भूजल योजना अधिक गतीमान करण्याची आवश्यकता, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प टप्पा-२ ला मंत्रीमंडळाची मान्यता मिळणे, कोकणातील उल्हास आणि वैतरणा नद्यांच्या खोऱ्यातून ५४.७० टीएमसी पाणी गोदावरी खोऱ्यात वळविण्याचा प्रकल्प प्रस्तावित असणे, राज्यात शेतकऱ्यांसाठी अतिशय महत्वाचे पांदण रस्ते तातडीने पूर्ण करण्याकरिता "मातोश्री पांदण रस्ते योजना" अधिक सुटसुटीत करुन राबविण्याची आवश्यकता, राज्यात सन २०२४-२०२५ च्या हंगामांतर्गत सोयाबीन, तूर, ज्वारी, चना, कापूस इत्यादी धान खरेदी झाली असणे, शासकीय खरेदी योजनेतील अनियमितता टाळण्यासाठी योजना सक्षम करण्याची आवश्यकता, राज्यात काही गावांतील शेतकऱ्यांना डिजिटल पध्दतीने देण्यात येणारे लाभ मिळण्यात असलेल्या अडचणी दूर करण्याची आवश्यकता, "मॅगनेट २.०" अंतर्गत कृषी व्यवसायाला चालना देण्यासाठी विशेष योजना हाती घेण्यात आली असणे, ऊर्जा वापराला प्रोत्साहन देतानाच ऊर्जा निर्मितीवर भर देण्यात येत असणे, १६००० मेगावॅट क्षमतेच्या सौरऊर्जा प्रकल्पांना गती देण्याचे धोरण आखण्यात येणे जेणेकरुन, शाश्वत व स्वच्छ ऊर्जा मिळेल आणि औद्योगिक क्षेत्राला त्याचा फायदा होईल, राज्यातील सर्व शासकीय इमारती सन २०२५ या वर्षाच्या अखेरपर्यंत संपूर्णपणे सौरऊर्जेद्वारे विद्युतीकरण करण्याचे धोरण असणे, शेतकऱ्यांना सिंचनासाठी सौर कृषीपंप उपलब्ध करुन देणारी "मुख्यमंत्री सौर कृषी योजना" राज्यात प्रभावीपणे राबविण्यात येत असणे, सौर ऊर्जेचा वापर वाढवून शाश्वत शेतीला प्रोत्साहन देण्याचे शासनाचे उद्दिष्ट असणे, महाराष्ट्र देशासाठी रोल मॉडेल व्हावे व राज्यातील शेतकरी सुजलाम-सुफलाम व्हावा यासाठी करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(२) **(गुरुवार, दिनांक १० जुलै, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) —**

**सर्वश्री अंबादास दानवे,** सतेज पाटील, एकनाथराव खडसे, ॲड.अनिल दत्तात्रय परब, सर्वश्री अभिजित वंजारी, शशिकांत शिंदे, सचिन अहिर, अशोक ऊर्फ भाई जगताप, सुनिल शिंदे, सर्वश्री जयंत आसगावकर, जगन्नाथ अभ्यंकर, डॉ.प्रज्ञा सातव, सर्वश्री धीरज लिंगाडे, राजेश राठोड, सुधाकर अडबाले, अरुण लाड, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव :- (चर्चा पुढे सुरु )**

"राज्यात आदिवासी विभागामार्फत राबविल्या जाणाऱ्या योजनांत गंभीर त्रुटी असणे, आदिवासी आश्रमशाळांमध्ये शिक्षकांची व कर्मचाऱ्यांची मोठ्या प्रमाणावर पदे रिक्त असून शिक्षणाचा दर्जा घसरलेला असणे, अनेक आदिवासी पाड्यांमध्ये रस्ते, वीज, पाणी, आरोग्य व शिक्षणाच्या मूलभूत सुविधा अद्याप उपलब्ध नसणे, निधीअभावी योजनांची गतीने व प्रभावी अंमलबजावणी होत नसणे, अपघातग्रस्त रुग्णांना वेळेवर प्राथमिक उपचार मिळत नसणे, शासकीय रुग्णवाहिका वेळेवर पोहचत नसून अनेक जिल्ह्यांतील रुग्णवाहिका दुरुस्ती अभावी बंद अवस्थेत असणे, त्यामुळे नवजात बालके व माता यांच्या मृत्यूचे प्रमाण वाढले असून रस्त्यावरील प्रसूतीच्या घटनांमध्येही वाढ झालेली असणे, शासकीय रुग्णालयांमध्ये वैद्यकीय अधिकारी, परिचारिका व अन्य कर्मचाऱ्यांची असंख्य पदे रिक्त असणे, अनेक वैद्यकीय अधिकारी ग्रामीण भागात सेवा देण्यास नकार देत असल्याने या भागातील आरोग्य व्यवस्था कोलमडली असणे, जन आरोग्य योजनेंतर्गत अनेक रुग्णालयांनी उपचार नाकारल्याच्या घटना घडत असणे, राज्यातील रक्तपेढ्यांवरील रक्ताच्या कमतरतेमुळे अनेक रुग्णांना मृत्युला सामोरे जावे लागणे, त्यामुळे राज्यातील सर्व रक्तपेढ्यांची तपासणी करुन सदरहू रक्तपेढ्या चोवीस तास चालू ठेवण्याची आवश्यकता, धर्मादाय रुग्णालय राज्याच्या नियमांचे सर्रास उल्लंघन करीत असून गरजू रुग्णांना प्रवेश रद्द, आगाऊ रकमेची मागणी व वचनबध्द सुविधा देण्यास जाणीवपूर्वक दुर्लक्ष करणे, वैद्यकीय महाविद्यालयांतील संरचना, कर्मचारी व औषधसाठा यांचा दर्जा अत्यंत निकृष्ट दर्जाचा असणे, कमी कन्टेन्टच्या व बोगस औषधांचा पुरवठा शासकीय रुग्णालयात होत असणे, राज्यात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या भुखंड वाटपामध्ये झालेली अनियमितता, भूखंडांचा वापर उद्योगासाठी होणे आवश्यक असताना निवासी वापराकरिता खाजगी विकासकांना देण्यात येणे, उद्योजकांना आवश्यक सोयी सुविधा देण्यास जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याने अनेक उद्योग इतर राज्यात स्थलांतरीत झालेले असणे, जल जीवन मिशन योजनेंतर्गत झालेल्या कामांमध्ये अनियमितता, निकृष्ट दर्जाचे साहित्य, अपूर्ण पाइपलाइन आणि अपारदर्शक खर्च यामुळे हजारो गावांना आजही सुरक्षित पाणीपुरवठा होत नसणे, राज्याच्या प्रगतीचा पाया असलेल्या तरुण पिढीसाठी रोजगाराच्या संधी कमी होत असून शासकीय विभागातील भरती प्रक्रिया प्रलंबित असल्याने विविध संवर्गातील ३ लाख पदे रिक्त असणे, याबाबत शासनाकडून वेळोवेळी आश्वासने देऊनही रिक्त जागा भरण्यास होत असलेले दुर्लक्ष, त्यातच सरकारने निवृत्त अधिकाऱ्यांना राज्यातील सरकारी विभागात कंत्राटी पध्दतीने

नियुक्ती देण्यासाठी योजना सुरु केली असणे, उक्त योजनेस बेरोजगार तरुणांचा असलेला विरोध, या सर्व प्रश्नांकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका".

## (दुपारी १२.०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे —**

(क) **शुक्रवार, दिनांक ४ जुलै, २०२५ रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीतील राखून ठेवण्यात आलेला श्री.अभिजित वंजारी व इतर वि.प.स. यांचा "महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षेतील प्रश्नपत्रिकेतील त्रुटींमुळे विद्यार्थ्यांना परीक्षा पुन्हा द्यावी लागणार असल्याबाबत" या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक २६१२.**

(ख) **तारांकित प्रश्न**

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे —**

(१) **उप मुख्यमंत्री तथा वित्तमंत्री** : "शासनाच्या उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, आदिवासी विकास विभाग व नगरविकास विभाग या विभागांतर्गत दिनांक १ एप्रिल, २०२४ ते दिनांक ३१ मार्च, २०२५ या कालावधीत प्रशासकीय नियंत्रणाखालील संस्था/ उपक्रमांना देण्यात आलेली कर्ज, कर्जरोखे, Letter of Comfort व त्यावरील व्याजास देण्यात आलेल्या हमी विषयीचे विवरणपत्र" सभागृहासमोर ठेवतील.

(२) **कृषी मंत्री** :

**(क)** "महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी यांचे सन २०२०-२०२१ या वर्षांचे वार्षिक लेखे व वार्षिक लेखा परिक्षण अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला यांचे सन २०१७-२०१८ व सन २०१८-२०१९ या वर्षांचे वार्षिक लेखे व वार्षिक लेखा परिक्षण अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

असुधारित प्रत

**(ग)** "डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ यांचा सन २०२३-२०२४ या वर्षाचा बावन्नावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : (क) म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना — (असल्यास)**

**(ख) म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनेचे निवेदन —**

**श्री.अंबादास दानवे, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक १४ वर मुख्यमंत्री निवेदन करतील :-**

छत्रपती संभाजीनगर शहरातील औरंगपुरा परिसरात, पोलीस चौकीच्या समोरच एका व्यावसायिक इमारतीत झन्ना मन्ना नावाचा मोठ्या प्रमाणावर सुरू असलेला जुगार अड्डा गुन्हे शाखेच्या पथकाने छापा टाकून उघडकीस आणलेला असणे, परंतु स्थानिक पोलीस यंत्रणा याकडे दुर्लक्ष करत असणे.

**चार : लक्षवेधी सूचना — (म.वि.प. नियम १०१ अन्वये) —**

(१) **सर्वश्री प्रविण दरेकर, प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्रीमती उमा खापरे, सर्वश्री ज्ञानेश्वर म्हात्रे, योगेश टिळेकर, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे (नगरविकास)** लक्ष वेधतील :-

"मुंबई महापालिका हद्दीत घनकचरा संकलन आणि परिवहन हे काम खासगी कंत्राटदारांना देण्याचा निर्णय महापालिका प्रशासनाने घेतला असून, या निर्णयाला कामगार संघटनांचा विरोध होत असल्याचे निदर्शनास येणे, सदर निर्णय पालिकेने मागे घ्यावा, अन्यथा आंदोलन छेडण्याचा इशारा म्युनिसिपल कर्मचारी युनियनने दिला असणे, घनकचरा संकलन व परिवहन हे महापालिकेचे बंधनकारक व कायमस्वरूपी काम असून, हे काम करण्यासाठी महापालिका प्रशासनाने आस्थापनेवर कायम कामगारांची पदे निर्माण करून त्यांची नेमणूक केली असणे, घनकचरा संकलन व परिवहनाचे काम करणाऱ्या कामगारांना त्या ठिकाणाहून बदली करून हे काम ठेकेदारामार्फत कंत्राटी कामगारांकडून करून घेण्याचा निर्णय प्रशासनाने घेऊन त्याची अंबलबजावणी करण्याचे ठरवले असणे, महापालिका प्रशासनाचा हा निर्णय चुकीचा, बेकायदेशीर, कामगारावर अन्याय करणारा असणे, औद्योगिक कलह कायदा १९४७ च्या कलम ९ (अ) मधील तरतुदीचा तसेच एमआरटीयु आणि पीयुएलपी कायदा १९७१ च्या अनुसूची ४ मधील तरतुदीचा भंग करणारा असणे, या निर्णयामुळे सध्या कार्यरत कर्मचाऱ्यांच्या मूळ जबाबदाऱ्या बदलल्या जाण्याची आणि त्यांना दुय्यम कामे सोपवली जाण्याची शक्यता निर्माण झाली असणे, परिणामी, त्यांच्या सेवा-अटी, हक्क आणि सुविधांवर विपरीत परिणाम

अग्रिम प्रत

होणार असणे, याबाबत शासनाने फेरविचार करण्याची आवश्यकता असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(२)** **सर्वश्री सुधाकर अडबाले, अभिजित वंजारी, अशोक ऊर्फ भाई जगताप, राजेश राठोड, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे (नगरविकास)** लक्ष वेधतील :-

"राज्यातील नगर परिषद / महानगरपालिका अंतर्गत दिनांक १ नोव्हेंबर, २००५ नंतर लागलेल्या शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना डीसीपीएस / एनपीएस / यूपीएस योजना यापैकी कोणतीही पेन्शन योजना लागू नसणे, विद्यार्थ्यांना ज्ञानदानाचे कार्य करणाऱ्या सदर शिक्षक - कर्मचाऱ्यांवर हा मोठा अन्याय असणे, सदर कर्मचाऱ्यांनी यापैकी एक पेन्शन योजना लागू करण्याबाबत वारंवार शासनाकडे मागण्या, आंदोलने केली असणे, सदर कर्मचाऱ्यांना कोणतीही पेन्शन योजना लागू करण्यात न आल्याने सदर कर्मचाऱ्यांमध्ये शासनाप्रती तीव्र असंतोष बघता दिनांक १ नोव्हेंबर, २००५ नंतर लागलेल्या नगर परिषद / महानगरपालिका शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना डीसीपीएस / एनपीएस / यूपीएस योजना लागू करण्याबाबत शासनाने करावयाची आवश्यक कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(३)** **श्री.विक्रांत पाटील, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे (नगरविकास)** लक्ष वेधतील :-

"शासन अधिसूचना दिनांक १८ नोव्हेंबर, २०१३ अन्वये १० लाख व त्यापेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या महानगरपालिका हद्दीतील ४००० चौ.मी. पेक्षा जास्त भू.क्षेत्र असलेल्या खाजगी जमिनीवर प्रकल्प अंतर्गत २०% राखीव क्षेत्र / गाळे म्हाडाला हस्तांतरित करण्याची तरतूद असताना नवी मुंबई महानगरपालिकाअंतर्गत अनेक नामांकित विकासकांनी सन २०१७ पासून ते २०२२ पर्यंत अनेक प्रकल्प-उभारून सर्वसामान्यांना परवडणारी हजारो-घरे प्रकल्पातून वगळले असल्याचा घोटाळा शासनाकडे केलेल्या अनेक तक्रारीतून उघडकीस येणे, नवी मुंबई महानगरपालिकाअंतर्गत मोरेश्वर डेव्हलपर्स, अक्षय रिअल्टर्स, लखाणी इंडस्ट्रीज, मयुरेश रियल इस्टेट, पिरामल सनटेक, या विकासकांनी प्रकल्प उभारण्याच्या आधी घेतलेल्या बांधकाम परवान्यात E.W.S. ची मान्यता घेतलेली असने परंतु UDCPR – २०२० मधील ३.८.४.चा आधार घेत अधिकाऱ्यांच्या संगनमताने कालांतराने पळवाट काढून बांधकाम परवान्यातून E.W.S. ची घरे वगळली असताना याच कालावधीत प्रकल्प उभारणाऱ्या भूमिका डेव्हलपर्स, नीलकंठ इम्प्राटेक, गुडविल कन्स्ट्रक्शन, गामी इन्फ्राटेक, सविता होम मेकर या विकासकानी मात्र घरे बांधलेली असणे, भूमीराज, बालाजी, व्हिजन इन्फ्रा, रिजेन्सी, बी एन्ड एम,

अप्रकाशित प्रत

बिलकॉन, थालिया गामी या विकासाकाकडून सी.सी. मध्ये घरांची मान्यता न घेताच प्रकल्प उभारणे, यामुळे नवी मुंबईतील उभारण्यात आलेल्या याप्रकल्पातून E.W.S. मधील जवळपास हजारो घरे गायब करण्याचा प्रताप नवी मुंबई महानगरपालिकेचे तत्कालीन सर्व अधिकारी यांच्या आर्थिक संगनमताने घडविण्यात आल्याने नवी मुंबई महानगरपालिकेच्या कारभारावरील सर्वसामान्य जनतेचा उडालेला विश्वास, अनेकवेळा तक्रार करूनही शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, EWS घरे न बांधणाऱ्या विकासकांवर कारवाई होत नसल्याने नागरिकांच्या मनात निर्माण झालेला तीव्र असंतोष व चीड शासनाने E.W.S. घरांचा घोटाळा करणाऱ्या विकासकांवर तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(४) **श्री.संजय केणेकर, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **महिला व बालविकास मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यात कुपोषण मुक्तीसाठी शासकीय आणि प्रशासकीय पातळीवर विविध योजना राबवणे, कार्यक्रम घेणे, जनजागृती करणे असे प्रयत्न होत असताना कुपोषण कमी होत नसून राज्यात फेब्रुवारी महिन्यात १ लाख ८२ हजार ४४३ कुपोषित बालके असल्याची धक्कादायक माहिती माहे एप्रिल २०२५ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्या सुमारास समोर येणे, एकात्मिक बालविकास सेवा योजनेअंतर्गत राज्यात तब्बल २० हजार ४१४ पदे रिक्त असल्याचे आढळून येणे, त्याचबरोबर बालविकास अधिकारी, पर्यवेक्षिका, अंगणवाडी सेविका, मदतनीस यांचीही भरती रखडली असून त्याचे परिणाम ग्रामीण भागात उमटत असून लहान मुलांचे आरोग्य, पोषण आणि विकास याबाबतीत अडथळा निर्माण होणे, राज्यातील सर्वाधिक मुंबई उपनगर जिल्ह्यात १६ हजार ३४४ कुपोषित बालकांची संख्या असल्याची नोंद होणे, सदर रिक्त पदे तातडीने भरून कुपोषण मुक्त करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(५) **श्री.जगन्नाथ अभ्यंकर वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **ग्रामविकास व पंचायत राज मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलढाणा यांचेकडून दिनांक ११ जून, २०२५ च्या आदेशाने ८ तालुक्यातील २० शाळांमध्ये कार्यरत असलेल्या शिक्षकांना निलंबित करण्यास गटविकास अधिकारी यांना प्राधिकृत केल्या जाणे, गटविकास अधिकारी यांनी कमालीची तत्परता दर्शवित कोणत्याही चौकशीविना दिनांक १३ जून, २०२५ ला आदेश काढून शाळेची पटसंख्या कमी होण्यास शिक्षक जबाबदार आहेत असे गृहीत धरुन निलंबनाचे आदेश काढले जाणे, कोणतीही चौकशी प्रक्रिया पार पाडल्या न जाणे, पटसंख्या घटण्यास शिक्षक जबाबदार आहेत असे निष्कर्ष नियंत्रण अधिकाऱ्याने काढलेले नसणे, इंग्रजी माध्यमाच्या शाळांना गावस्तरावर देण्यात आलेल्या

अप्रकाशित प्रत

परवानगीमुळे पालकांनी आपली पाल्ये इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये प्रविष्ठ केल्याची वस्तुस्थिती लक्षात घेतल्या न जाणे, जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये प्रत्येक वर्गाला आणि विषय अध्यापनाला शिक्षकांची उपलब्धता नसणे, शैक्षणिक साहित्याचा या शाळांमध्ये पुर्णतः अभाव असणे, आधीच कमी असलेल्या आणि एका शिक्षकाकडे ४ ते ५ वर्ग अध्यापनांची जबाबदारी असताना त्यांचेकडे विविध अशैक्षणिक कामाचे ओझे प्रशासनाकडून लादले जाणे, अशाही परिस्थितीत अध्यापनाचे कार्य नितांत निष्ठेने पार पाडीत असताना गैरहेतूने व पुर्वग्रह भावनेने दुषित राहून पटसंख्या कमी झाल्याचे एकमेव कारण देऊन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी प्राथमिक शिक्षकांना सेवेतून निलंबीत करण्याचे दिलेले बेकायदेशीर आणि तर्कदुष्ट आदेश, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(६) **श्री.किशोर दराडे**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **ग्रामविकास व पंचायत राज मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यात महिला सुरक्षेचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत आहे असणे, महिला वर्ग उच्च शिक्षण घेऊन शासकीय सेवेत नोकरी करून स्वतःच्या पायावर उभ्या राहत असणे,मात्र नाशिक जिल्हा परिषदेत वर्षानुवर्ष म्हणजे १० ते १५ वर्ष ठाण मांडून बसलेले काही अधिकारी तेथे कार्यालयात व जिल्हा परिषदेच्या जिल्ह्यातील इतर ठिकाणी कार्यरत महिलांच्या बाबत शारीरिक, मानसिक व लैंगिक छळ करत असल्याबाबत निदर्शनास येणे, हे छळ व अत्याचार अनेक वर्षांपासून सुरू असणे, लैंगिक छळास विरोध करणाऱ्या महिला वर्गाची बदली प्रक्रियेमध्ये अवघड ठिकाणी बदली करणे, सदर प्रकरणात वर्ग १ दर्जाचे खातेप्रमुख व वरिष्ठ अधिकारी सहभागी असल्याचे वृत्त पत्रातील बातम्या वरून समजणे, या प्रकरणातील अनेक अर्ज दाबून टाकणे, गहाळ करणे असे प्रकार झालेले असणे, प्रकरण हाताबाहेर गेल्यानंतर विशाखा समितीने चौकशी करणे, सदर प्रकरणाची महिला आयोग यांनी दखल घेणे, संबंधित प्रकरणाने महिला कर्मचारी यांच्या मध्ये संतापाचे व भीतीचे वातावरण असणे, तरी संबंधितांना निलंबित करून चौकशी केल्यास अजूनही अनेक प्रकरणे बाहेर येऊ शकतात, या सर्व प्रकरणावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(७) **श्री.राजेश राठोड, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"आशिया खंडातील एक मोठे मासेमारी बंदर म्हणून ओळख असलेल्या मुंबईतील कुलाबा विभागात ससून डॉक नावाजलेले असणे, या ठिकाणी मासळीचा मोठा व्यापार चालत असून,बंजारा समाज येथे आपली रोजी रोटी कमावण्यासाठी आलेला असणे, या ससून डॉकमधून दरवर्षी हजारो कोटी

असुधारित प्रत

रुपयांची मासळी परदेशी निर्यात होत असणे, निर्यात होण्यापूर्वी या मासळीचे काम हा आदिवासी समाज कित्येक वर्षापासून करत असणे, बोटीतून मासळी उपसणे, हाताच्या नखाने मासळी सोलणे,बोटीची निगा राखणे अशी अंगमेहनतीची अनेक कामे बंजारा समाजातील जवळपास २० हजार कामगार अहोरात्र मेहनत करत असणे, परंतु महत्वाच्या व्यापारपेठेतील हे कामगार अनेक मुलभूत सोयी सुविधांपासून वंचित राहत असणे, स्वातंत्र्योत्तर काळापासून वंचित राहिलेल्या व दुर्लक्षित असलेल्या या आदिवासी बंजारा समाजाला बोटीवरील हजारो टन निर्यातक्षम मासळी सोलणाऱ्या मुख्यत: महिला व पुरुष कर्मचाऱ्यांसाठी विश्रांती घेण्यासाठी व भोजन करण्यासाठी स्वतंत्र विश्रामगृहाची आवश्यकता, महिलांसाठी सुलभ शौचालयाची स्वतंत्र व्यवस्था, नवजात बालके आणिं लहान मुलांचा सांभाळ करण्यासाठी पाळणाघर, स्वच्छ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, स्वस्त दरातील शिवभोजन उपहारगृह व प्राथमिक शिक्षणासाठी बालवाडीची गरज, घनकचरा व्यवस्थापनाची व्यवस्था इत्यादी त्यांच्या मुलभूत मागण्या असून,त्या मागण्या मंजूर झाल्यास त्यांना दिलासा मिळेल,याकरीता शासनाने लक्ष घालून मासळी व्यवसायातील बंजारा कामगारांच्या समस्या सोडविण्याबाबत करावयाची तातडीची कार्यवाही व यावर शासनाची प्रतिक्रिया."

**पाच : म.वि.प. नियम १०१ – अ अन्वये विशेष उल्लेख – (असल्यास)**

**सहा : शासकीय विधेयके –**

**विधानसभेने संमत केल्याप्रमाणे – विचार, खंडश: विचार व संमत करणे.**

**(क)** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७६ - महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२५

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अंबादास दानवे, सतेज उर्फ बंटी पाटील, शशिकांत शिंदे, सचिन अहिर, एकनाथराव खडसे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७६ - महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२५" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

अस्वीकृत प्रत

**(ख)** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७७ - महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण (सुधारणा) विधेयक, २०२५

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अंबादास दानवे, सतेज उर्फ बंटी पाटील, शशिकांत शिंदे, सचिन अहिर, एकनाथराव खडसे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७७ - महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण (सुधारणा) विधेयक, २०२५" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ग)** सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३३ - महाराष्ट्र विशेष जन सुरक्षा विधेयक, २०२४.

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. सचिन अहिर, ॲड अनिल परब, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३३ - महाराष्ट्र विशेष जन सुरक्षा विधेयक, २०२४" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

## — अशासकीय कामकाज —
## (बैठकीच्या अखेरचे २ १/२ तास)

**सात : अशासकीय विधेयके :-**

**(क) पुर:स्थापनार्थ :-**

**(१)** सन २०२५ चे वि.प.वि. क्रमांक ९ - महाराष्ट्र राज्यातील कर्मचाऱ्यांची त्यांच्या मातापित्यांप्रती जबाबदारी, उत्तरदायित्व तसेच देखभाल यासंदर्भातील मानकांबाबत तरतूद करण्यासाठी विधेयक, २०२५ - श्री. अंबादास दानवे, वि.प.स. यांचे

**(२)** सन २०२५ चे वि.प.वि. क्रमांक १० - महाराष्ट्र राज्यात दुय्यम पशुवैद्यकीय परिषद स्थापन करण्याबाबत तरतूद करण्यासाठी विधेयक, २०२५ - डॉ. मनिषा कायंदे, वि.प.स. यांचे

**(ख) विचारार्थ -**

**(१)** सन २०२३ चे वि.प.वि. क्रमांक ४ - महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक, २०२३ - श्री.अंबादास दानवे, वि.प.स. यांचे

**(२)** सन २०२३ चे वि.प.वि. क्रमांक १ - महाराष्ट्र राज्यात लैंगिक गुन्ह्यांना प्रवृत्त करणाऱ्या जाहिराती, जाहिरात-फलक लावण्यास, समाज माध्यमांवर व संकेतस्थळांवर प्रसिध्द करण्यास प्रतिबंध करण्याबाबत विधेयक, २०२३ - श्री.अंबादास दानवे, वि.प.स. यांचे

**(३)** सन २०२३ चे वि.प.वि. क्रमांक ५ - महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन (सुधारणा) विधेयक, २०२३ - श्री.अंबादास दानवे, वि.प.स. यांचे

**(४)** सन २०२३ चे वि.प.वि. क्रमांक ६ - महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन (सुधारणा) विधेयक, २०२३ - श्री.अंबादास दानवे, वि.प.स. यांचे

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : १० जुलै, २०२५

**डॉ. विलास आठवले**
सचिव - ३,
महाराष्ट्र विधानपरिषद

असुधारित प्रत